Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 4.94
ISSN No. 2456-1665

# राजर्षी शाहु महाराजांचे सामाजिक विचार

**डॉ. महादेव गणपत देशमुख**
इतिहास विभाग
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, तुळजापुर

## प्रस्तावना

राजर्षी शाहु महाराज हे थोर समाजसुधारक होते. त्यांना समाजातील पद दलित वर्ग आणि जाती यांचा विकास घडवायचा होता. त्यांना ब्राह्मण वर्चस्वाच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय इत्यादी परिणामांचा अनुभव घेतलेला होता. त्यांना लोकशाहीमधील समानता, न्याय आणि बंधुत्व या तत्वांवर आधारलेला समाज निर्माण करावयाचा होता.[1] त्यांच्या मताप्रमाणे न्याय समाजाच्या विकासामध्ये प्रमुख अडथळा म्हणजे खोलवर मूळ धरलेली जातीव्यवस्था आणि अस्पृश्यता होय. त्याचबरोबर शिक्षण आणि प्रशासन यातील ब्राहमण वर्चस्व आणि धर्माविषयी चुकीच्या संकल्पना दूर करण्यासाठी त्यांनी केवळ सामाजिक विकासाचा एक कार्यक्रम सुचविला असेच नव्हे तर त्याची कार्यवाही देखील केली.[2]

## संशोधनाची गृहितके :

1. राजर्षी शाहु महाराजांनी अस्पृश्यता निवारणासाठी कार्य केले.
2. राजर्षी शाहु महाराजांनी धार्मिक कर्मकांडाला विरोध केला.

## संशोधनाची उद्दिष्टे :

1. राजर्षी शाहु महाराजांच्या सामाजिक विचारांचा आढावा घेणे.
2. राजर्षी शाहु महाराजांचे अस्पृश्यता निवारणासंबंधी विचारांचा अभ्यास करणे.
3. राजर्षी शाहु महाराजांनी दीन दलितांसाठी केलेल्या कार्याचा आढावा मागोवा घेणे.

## 1 राजर्षी शाहु महाराज वेद आणि क्रांतीकारी तत्वज्ञान

राजर्षी शाहु यांच्या 28 व्या वर्षाच्या कार्यकाळाच्या सुरुवातीपासूनच गरीबांच्या उन्नतीकरिता व त्यांना जातीव्यवस्थेच्या वर्चस्वातून मुक्ती देउन कार्य करायचे ठरविले होते. वेदोक्त प्रकरणामुळे त्यांच्या मुक्तीच्या चळवळीला मोठी चालना मिळाली. सन 1900 च्या ऑक्टोबर मध्ये पंचगंगा नदीच्या तीरावर घडलेल्या एका घटनेमधुन वेदोक्त वाद उदभवला. राजर्षी शाहु महाराजांच्या पवित्र स्नानासाठी जो पुरोहित धार्मिक विधी करणार होता त्याने

स्वतः शुध्द केले नव्हते.[3] त्याने कृतीचे समर्थन या आधारावर केले की, पौराणिक मंत्रोपच्चाराकरिता वैदिकमंत्राची मुळीच गरज नव्हती. राजर्षी शाहु यांचा या उत्तराने मोठा अपमान झाला. त्यांच्या ध्यानात आले की, राजवाडयातील पुरोहित सर्व धार्मिक विधी पौराणिकमंत्र म्हणून करतात वैदिक मंत्राद्वारे नाही. याचकरिता शाहु महाराजांनी पुरोहितांना सर्व धार्मिक विधी वैदिक मंत्रोच्चाराने करण्याचा आदेश दिला. या आदेशाप्रमाणे कार्यवाही करण्यामध्ये जे चुकारपणा करतील त्यांना सेवेतून निलंबित करण्यात येईल असे सांगितले.[4]

वरील विवेचनावरुन असे निदर्शनास येते की, राजर्षी शाहु महाराजांनी वैद मंत्राद्वारे होणारे धार्मिक विधीना विरोध दर्शविला होता कारण त्यांच्या मते, राजवाडयातील पुरोहित हे सर्व धार्मिक विधी पौराणिक मंत्र म्हणून करतात, वैदिक मंत्राद्वारे ते धार्मिक विधी करीत नाहीत.

**2. राजर्षी शाहु महाराज यांचे धार्मिक विचार** :

राजर्षी शाहु महाराज निरश्वरवादी नव्हते पण त्यांचा धुर्त ब्राम्हण धर्माला विरोध होता, ज्यांच्यामुळे अन्याय, असमानता आणि असत्य यांच्यावर आधारलेली होती. राजर्षी शाहु महाराजांच्या ब्राम्हणवादी धर्माला विरोध असला तरी आर्यसमाजाचे ते पाठीराखे होते.[5] ज्याची स्थापना स्वामी दयानंद सरस्वती यांनी केली होती. राजर्षी शाहु महाराजांच्यामते, आर्यसमाज जगामध्ये सर्वात श्रेष्ठ असून तो सर्वच दलित वर्गांना समान धर्म व अधिकार यांची संधी देतो[6]

राजर्षी शाहु महाराज यांनी परमेश्वर आणि मानव यांच्यातला मध्यस्थ मानला नाही आणि अविधान केले की, सत्य धर्म हाच मुक्तता मिळविण्याचा एकमेव मार्ग आहे.

उपरोक्त विवेचनावरुन असे निदर्शनास येते की, राजर्षी शाहु महाराजांनी धुर्त ब्राम्हण कर्मकांडाला विरोध केला होता कारण ब्राम्हण प्रतिगामी वैचारिकतेमध्ये दलित वर्गाला देण्यात येणारी हिनतेची वागणुक हे या विरोधाचे मुळ कारण होते.

**3. राजर्षी शाहु महाराजांचा जाती व्यवस्थेला विरोध :**

राजर्षी शाहु महाराज मुलतः जाती रचनेच्या विरोधात होते. त्यांच्या जीवनाचे मुख्य ध्येय पद दलित वर्गाच्या उत्थानासाठी कार्य करणे हेच होते. जातीव्यवस्थेला त्यांनी सर्वसाधारणपणे आणि ब्राम्हणवादाला विशेष करुन विरोध केला.[7] त्यांच्यामते, भारतामधील जातीव्यवस्था हेच इथल्या अन्याय व्यवस्थेचे कारण होते. त्यांनी अशी खात्री होती की, ब्रिटिश शिक्षणाच्या मदतीने जातीव्यवस्था दुबळी होउ शकेल. राजर्षी शाहु महाराजांनी

जातीव्यवस्थेविरुध्द अविश्रांत संघर्ष केला. त्यांचे प्रमुख उदि्दष्ट शुद्रांची अज्ञान आणि गुलामगिरी मधून मुक्तता करणे हेच होते.[8]

मार्च 1920 रोजी माणगांव येथे झालेल्या ऐतिहासिक माणगांव परिषदेमध्ये राजर्षी शाहु महाराज म्हणाले होते की, भारत वगळता जगातल्या कोणत्याच देशामध्ये जाती व्यवस्थानाही. अतिशय दु:खाची बाब ही आहे की, आपण आपल्या बंधुंना आणि बहिणींना प्राण्यांपेक्षाही हीन वागणुक देतो.[9]

राजर्षी शाहु महाराज यांनी केवळ जातीसंस्थेला विरोध केला असेच नव्हे तर त्यांनीही क्रुर अमानवी जातीव्यवस्था संपविण्यासाठी उपायसुध्दा सुचविले, ते खालीलप्रमाणे

1. जन्म आणि संपत्ती यावर आधारलेला सामाजिक स्तर नष्ट झाला पाहिजे. ,
2. प्रशासन आणि शासन यांच्या सेवेमध्ये एका विशिष्ट जातीमधीलच कर्मचारी भरती थांबवली जावी.
3. आंतरधर्मीय व आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहित केले जावेत.
4. सर्वांना समान संधी उपलब्ध केली जावी. गुणवत्ता हाच नोकरभरतीचा एकमेव निष्कर्ष असावा.[10]

**4. राजर्षी शाहु महाराज आणि अस्पृश्यता निर्मूलन :**

अस्पृश्यतेचे उच्चाटन करण्याचा राजर्षी शाहु महाराज यांचा प्रयत्न जाती व्यवस्थेला विरोध करण्याचा एक भाग होता. त्यांचा असा ठाम विश्वास होता की, अस्पृश्यता ही अशास्त्रीय, दुष्ट आणि अमानवीय आहे. त्यांनी असे दाखवून दिले की ब्राम्हण केवळ मराठयांचाच द्वेष करीत नव्हते तर माणसांच्या वेगवेगळया जाती सर्वच जातींचा द्वेष करीत होत्या.[11] त्यांनी अस्पृश्यांच्या गुलामगिरी आणि बंधनाच्या मुक्ततेचे महत्त्व प्रतिपादन केले. राजर्षी शाहु महाराज यांच्यामते, जाती व्यवस्थेचे वर्चस्व नाहीसे करण्यासाठी त्यांनी केलेला संघर्षच अस्पृश्यांची किळसवाणी परिस्थिती सुधारु शकेल.

दि. 30 मे 1920 रोजी नागपूर येथील भाषणात अस्पृश्यते विषयी राजर्षी शाहुंनी आपले विचार स्पष्ट केले. अखिल भारतीय बहिष्कृत समाजपरिषदेला उद्देशुन ते म्हणाले की, अस्पृश्य या शब्दाचा मी धिक्कार करतो. कोणालाही अस्पृश्य हा शब्द वापरणे हे योग्य नाही. आपण सर्व बंधु असून आपले अधिकार समान आहेत सर्व भारतीय त्यांची कोणतीही जात धर्म अथवा वर्ण यांचाविचार न करता हिंदी नागरिकत्व आहेत. जरी धर्म एखाद्या व्यक्तीच्या

मताप्रमाणे महत्वाचा भाग असला तरीही तो धर्मश्देशाच्या एकात्मतेच्या मार्गात येता उपयोगी नाही.[12]

**सारांश :**

वरील विवेचनावरुन असे लक्षात येते की, राजर्षी शाहु महाराजांचे सामाजिक विचार अतिशय प्रभावशाली व परिणामकारक स्वरुपाचे होते. त्यांनी ब्राम्हणवादी विचारांना जे की मानवी मुल्यांच्याविरोधी आहे अशा विचारांना त्यांनी विरोध दर्शविला. राजर्षी शाहु महाराजांनी आपल्या विचारातुन सामाजिक विषमतेवर एक प्रभावशाली असे काम केले. राजर्षी शाहु महाराजांनी आपल्या कार्यकाळामध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या अस्पृश्यता निवारणा मधील कार्याला देखील आपला पांठिबा दर्शविला. अस्पृश्यता निवारणाच्या संदर्भातील राजर्षी शाहु महाराज यांचे कार्य देखील अतिशय समर्पक व परिणामकारक होते.

**संदर्भसुची :**

1. Mudaliar Chandra : The Kolhapur Movement Chhatrapati Shahu Lectures Series - I Shivaji University, Kolhapur Publications - 1981
2. Ibid
3. Ibid
4. जाधव बी.बी. : राजर्षी श्री शाहु महाराजांची भाषणे राजर्षी प्रकाशन 1971
5. कित्ता
6. रमेश ढावरे संपादक : माणगांव परिषद 61 वा स्मृती महोत्सव मार्च 1982
7. कित्ता
8. भोसले एस.एस : काल विचार आणि कार्य कोल्हापूर एप्रिल 1975
9. बगाडे डी. आर. छ. शाहु महाराज आणि कायदे कानून कोल्हापूर 6 मे 1982
10. कित्ता
11. कित्ता
12. कित्ता